दूरध्वनी : (०२०) २६९०२१००
थेट : (०२०) २६९०२२११
फॅक्स : (०२०) २६९०२२४४
तार : डेकशुगर मांजरी (बुद्रुक), पुणे
ई-मेल : scdeshmukh@vsnl.net
वेब साईट : www.vsisugar.com

VSI
संशोधनेन संवृद्धिः

ISO 9001:2008

# वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट

मांजरी (बुद्रुक), ता. हवेली, जि. पुणे : ४१२ ३०७, महाराष्ट्र, भारत

**शिवाजीराव देशमुख** आय ए एस् (निवृत्त)
महासंचालक

व्हीएसआय/कृषि/ज्ञानयाग-ज्ञानलक्ष्मी/ 3502 /२०१८-१९ — ऑक्टोबर २३, २०१८

प्रति,

मा.अध्यक्ष

विषय : 'ऊस शेती ज्ञानयाग' व 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' कार्यक्रमाबाबत...

महोदय,

महाराष्ट्रात ऊसाची व साखरेची उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक ऊस शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना माहित होणे आणि प्रत्यक्ष त्याचा वापर शेतीमध्ये होणे ही काळाची गरज आहे. या उद्देशाने मागील २१ वर्षापासून वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट तर्फे प्रत्येक वर्षी ऊस उत्पादक पुरूष शेतकऱ्यांसाठी 'ऊस शेती ज्ञानयाग' आणि ऊस उत्पादक महिला शेतकऱ्यांसाठी 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. या प्रशिक्षणास लाभणारा मोठा प्रतिसाद लक्षात घेता आणि त्याची व्याप्ती वाढावी म्हणून मागील ३ वर्षापासून दोन टप्प्यात (जून-जुलै आणि नोव्हेंबर- डिसेंबर महिन्यांत) प्रशिक्षण घेण्याचे ठरविलेले आहे. यावर्षी माहे नोव्हेंबर- डिसेंबर महिन्यांत घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कार्यक्रमाचे नांव | कालावधी | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>विदर्भ आणि कोल्हापूर जिल्ह्यातील कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | १३ ते १७ नोव्हेंबर २०१८ |
| २ | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>सांगली, सातारा जिल्ह्यातील तसेच मराठवाडा आणि खानदेश विभागातील कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१८ |
| ३ | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>पुणे, सोलापूर, अहमदनगर, नाशिक जिल्ह्यातील आणि इतर राज्यातील सदस्य कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | ४ ते ८ डिसेंबर २०१८ |
| ४ | **ऊस शेती ज्ञानलक्ष्मी**<br>महाराष्ट्रातील सर्व साखर कारखाने व इतर राज्यातील सदस्य कारखाने यांच्या महिला शेतकऱ्यांसाठी | पाच दिवस | ११ ते १५ डिसेंबर २०१८ |

'ऊस शेती ज्ञानयाग' या कार्यक्रमाचे हे एकोणतिसावे वर्ष असून 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' या कार्यक्रमाचे हे चौदावे वर्ष आहे. वरील कार्यक्रमात आत्तापर्यंत जवळजवळ २०४०४ शेतकरी प्रशिक्षित झालेले आहेत. सदर कार्यक्रमात **ऊस शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान** या विषयावर प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन केले जाते. प्रशिक्षण घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे, तसेच प्रशिक्षित शेतकऱ्यांनी ऊस शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऊसाचे दरमहा दरएकरी उत्पन्न वाढविलेले आहे. प्रशिक्षणार्थींची राहाण्याची व जेवणाची सोय संस्थेच्या वसतीगृहात केली जाते, तसेच प्रशिक्षण साहित्य म्हणून त्यांना बॅग, पुस्तिका, पेन व पॅड देखील पुरविले जाते. समारोप प्रसंगी प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्रक आणि सामुदायिक फोटोची प्रत दिली जाते.

तरी आपण कृपया आपल्या साखर कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीत-जास्त ऊस उत्पादक पुरूष व महिला शेतकऱ्यांना वरील कालावधीत प्रशिक्षणासाठी पाठवून प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. प्रशिक्षणार्थींनी कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी मांजरी येथील संस्थेच्या वसतीगृहामध्ये मुक्कामास यावे. प्रशिक्षणासाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थीस रू.२५००/- याप्रमाणे फी आकारण्यात येईल. यात महिला प्रशिक्षणार्थींच्या सोबत येणाऱ्या अन्य व्यक्तींचा समावेश नसून त्यांचे बरोबर अन्य व्यक्ती आल्यास त्यांना प्रतिदिन रू.२००/- प्रमाणे वेगळा आकार द्यावा लागेल. तसेच प्रशिक्षणार्थींच्या बरोबर येणाऱ्या वाहनचालकांनाही प्रति दिन रू.२००/- प्रमाणे वेगळा आकार द्यावा लागेल.प्रशिक्षणार्थींच्या नावाची यादी व त्याचे एकूण शुल्क वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे यांचे नावे डिमांड ड्राफ्ट किंवा आर.टी.जी.एस. द्वारे १० नोव्हेंबर २०१८ च्या आत पाठवून द्यावे, ही विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित,

(शिवाजीराव देशमुख)

दूरध्वनी : (०२०) २६९०२१००
थेट : (०२०) २६९०२२११
फॅक्स : (०२०) २६९०२२४४
तार : डेकशुगर मांजरी (बुद्रुक), पुणे
ई-मेल : scdeshmukh@vsnl.net
वेब साईट : www.vsisugar.com

ISO 9001:2008

VSI
संशोधनेन संवृद्धिः

# वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट

मांजरी (बुद्रुक), ता. हवेली, जि. पुणे : ४१२ ३०७, महाराष्ट्र, भारत

**शिवाजीराव देशमुख** आय ए एस् (निवृत्त)
**महासंचालक**

व्हीएसआय/कृषि/ज्ञानयाग-ज्ञानलक्ष्मी/ 3501 /२०१८-१९ ऑक्टोबर २३, २०१८

प्रति,

मा. कार्यकारी संचालक ,

विषय : 'ऊस शेती ज्ञानयाग' व 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' कार्यक्रमाबाबत...

महोदय,

महाराष्ट्रात ऊसाची व साखरेची उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक ऊस शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना माहित होणे आणि प्रत्यक्ष त्याचा वापर शेतीमध्ये होणे ही काळाची गरज आहे. या उद्देशाने मागील २१ वर्षापासून वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट तर्फे प्रत्येक वर्षी ऊस उत्पादक पुरूष शेतकऱ्यांसाठी 'ऊस शेती ज्ञानयाग' आणि ऊस उत्पादक महिला शेतकऱ्यांसाठी 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. या प्रशिक्षणास लाभणारा मोठा प्रतिसाद लक्षात घेता आणि त्याची व्याप्ती वाढावी म्हणून मागील ३ वर्षापासून दोन टप्प्यात (जून-जुलै आणि नोव्हेंबर- डिसेंबर महिन्यांत) प्रशिक्षण घेण्याचे ठरविलेले आहे. यावर्षी माहे नोव्हेंबर- डिसेंबर महिन्यांत घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कार्यक्रमाचे नांव | कालावधी | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>विदर्भ आणि कोल्हापूर जिल्ह्यातील कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | १३ ते १७ नोव्हेंबर २०१८ |
| २ | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>सांगली, सातारा जिल्ह्यातील तसेच मराठवाडा आणि खानदेश विभागातील कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१८ |
| ३ | **ऊस शेती ज्ञानयाग**<br>पुणे, सोलापूर, अहमदनगर, नाशिक जिल्ह्यातील आणि इतर राज्यातील सदस्य कारखान्यांचे पुरूष शेतकरी | पाच दिवस | ४ ते ८ डिसेंबर २०१८ |
| ४ | **ऊस शेती ज्ञानलक्ष्मी**<br>महाराष्ट्रातील सर्व साखर कारखाने व इतर राज्यातील सदस्य कारखाने यांच्या महिला शेतकऱ्यांसाठी | पाच दिवस | ११ ते १५ डिसेंबर २०१८ |

'ऊस शेती ज्ञानयाग' या कार्यक्रमाचे हे एकोणतिसावे वर्ष असून 'ऊस शेती ज्ञानलक्ष्मी' या कार्यक्रमाचे हे चौदावे वर्ष आहे. वरील कार्यक्रमात आत्तापर्यंत जवळजवळ २०४०४ शेतकरी प्रशिक्षित झालेले आहेत. सदर कार्यक्रमात **ऊस शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान** या विषयावर प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन केले जाते. प्रशिक्षण घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे, तसेच प्रशिक्षित शेतकऱ्यांनी ऊस शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऊसाचे दरमहा दरएकरी उत्पन्न वाढविलेले आहे. प्रशिक्षणार्थींची राहाण्याची व जेवणाची सोय संस्थेच्या वसतीगृहात केली जाते, तसेच प्रशिक्षण साहित्य म्हणून त्यांना बॅग, पुस्तिका, पेन व पॅड देखील पुरविले जाते. समारोप प्रसंगी प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्रक आणि सामुदायिक फोटोची प्रत दिली जाते.

तरी आपण कृपया आपल्या साखर कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीत-जास्त ऊस उत्पादक पुरूष व महिला शेतकऱ्यांना वरील कालावधीत प्रशिक्षणासाठी पाठवून प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. प्रशिक्षणार्थींनी कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी मांजरी येथील संस्थेच्या वसतीगृहामध्ये मुक्कामास यावे. प्रशिक्षणासाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थीस रू.२५००/- याप्रमाणे फी आकारण्यात येईल. यात महिला प्रशिक्षणार्थींच्या सोबत येणाऱ्या अन्य व्यक्तींचा समावेश नसून त्यांचे बरोबर अन्य व्यक्ती आल्यास त्यांना प्रतिदिन रू.२००/- प्रमाणे वेगळा आकार द्यावा लागेल. तसेच प्रशिक्षणार्थींच्या बरोबर येणाऱ्या वाहनचालकांनाही प्रति दिन रू.२००/- प्रमाणे वेगळा आकार द्यावा लागेल.प्रशिक्षणार्थींच्या नावाची यादी व त्याचे एकूण शुल्क वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे यांचे नावे डिमांड ड्राफ्ट किंवा आर.टी.जी.एस. द्वारे १० नोव्हेंबर २०१८ च्या आत पाठवून द्यावे, ही विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित,

(शिवाजीराव देशमुख)